दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २०२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२२ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## संदीप तुपे यांचे भाजपातून निलंबन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पक्षाची बदनामी होईल, असे वर्तन करत असल्याबद्दल कामोठे येथील शक्ती केंद्र प्रमुख संदिप तुपे यांचे भारतीय जनता पार्टीतून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

संदीप तुपे हे आपल्या वर्तनातून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी वारंवार पक्षाकडे येत आहेत, त्या अनुषंगाने या संदर्भात वारंवार समज दिली तसेच त्याबतचे लेखी पत्रही तुपे यांना जिल्हा भाजपच्यावतीने देण्यात आले होते.

तरी सुद्धा संदीप तुपे यांच्या वर्तनात बदल झाला नाही, उलट तक्रारीमध्ये अधिक वाढ होत चालली असल्याने अखेर पक्षाची बदनामी थांबवण्याकरिता संदिप तुपे यांचे भारतीय जनता पार्टीतून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

# तब्बल तीन वर्षानंतर मिनिट्रेन पुन्हा रुळावर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन आज शनिवार दि.२२ ऑक्टोबर पासून पुन्हा सेवेत येणार आहे. या मार्गावरील रुळांसह अन्य कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तब्बल तीन वर्षांनंतर ही गाडी धावणार आहे.या गाडीमुळे माथेरानमध्ये पुन्हा पर्यटनवृद्धीस मदत होणार आहे. यामुळे माथेरान मधील नागरिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

साल २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नेरळ ते माथेरान मार्गावरील रेल्वे रुळांचे मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर या मिनी ट्रेनचा मार्ग बंद ठेवण्यात आला होता. आता या मार्गावर रूळ, 'क्रॅश बॅरियर' याच्या सह अनेक उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. ही कामे पूर्ण होताच ट्रेनची दोन वेळा चाचणी घेण्यात आली.मिनिट्रेन ची चाचणी केल्यानंतर मिनीट्रेन पुन्हा पर्यटकांच्या सेवेत येत आहे.असे मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवाजी सुतार यांनी सांगितले.

मध्य रेल्वे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी यांनी गुरुवारी मिनीट्रेन मार्गाची पाहणीही केली.ते माथेरान मध्ये आले असता येथील सर्व राजकीय नेते मंडळींनी त्यांची आवर्जून भेट घेतली.आणि नेरळ-माथेरान-नेरळ मिनिट्रेन सेवा लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी केली होती. तसेच यासाठी काही नेतेमंडळींनी दिल्ली दौरे देखील केले होते.या सर्वांच्या प्रयत्नातून ही मिनिट्रेन पर्यटकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात येत आहे.या नेरळ ते माथेरान मिनी ट्रेनमधून प्रवासाला दोन तास ४० मिनिटे लागणार आहेत.

दरम्यान, सध्या प्रवासी आणि पर्यटकांच्या सेवेसाठी नेरळ-माथेरान मार्गावरील अमन लॉज-माथेरान या दरम्यान शटल सेवा सुरू आहे.परंतु ही नेरळ-माथेरान-नेरळ ही मिनिट्रेन सेवा सुरू होताच येथील अमन लॉज ते माथेरान शटल सेवेच्या फेर्या कमी केल्या गेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. निदान शनिवार आणि रविवारी तरी शटल सेवे च्या दहा फेर्या असाव्यात असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.



## बी.सी. जिंदाल रुग्णालयातील त्या डॉक्टर वर कारवाई कधी?

### जिंदाल व्यवस्थापनाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ : ग्रामपंचायतीच्या पत्राला केराची टोपली

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दितील सुकेळी येथील बी.सी. जिंदाल चॅरिटेबल ट्रस्टच्या जिंदाल रूग्णालयातील वादग्रस्त दोन वैद्यकीय अधिका-यांपैकी महिला डॉक्टरवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. मात्र मुख्य वैद्यकीय अधिकारी असलेल्या डॉ. गोपाल परमार यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने या डॉक्टरवर कारवाई कधी होणार तसेच जिंदाल व्यवस्थापनाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे का ? असे प्रश्न ऐनघर पंचक्रोशीतील नागरिकांतून उपस्थित करण्यात येत आहेत. तर याप्रकरणी ग्रामपंचायतीच्या पत्राला जिंदाल प्रशासनाने केराची टोपली तर दाखविली नाही ना अशी शंकाही उपस्थित करण्यात येत आहे.




रूग्णांना वाईट वागणूक दिल्याने जिंदालच्या दोन्ही डॉक्टर्सवर कारवाईची मागणी करणाऱ्या ऐनघर ग्रामपंचायतीच्या पत्राला जिंदाल व्यवस्थापनाकडून उत्तर देतांना संबधित महिला डॉक्टरला काढल्याचे काही दिवसांपूर्वी स्पष्ट करण्यात आले होते. मात्र जबाबदार असलेल्या दुस-या डॉक्टरवर का कारवाई का जात नाही याचे उत्तर देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांच्या बाबतीत हलगर्जीपणा दाखविल्याने तक्रार केलेल्या या डॉक्टर्सवरील कारवाई अद्यापही गुलदस्त्यात असल्याचे दिसून येत असून स्थानिक नागरिकांतून उलटसुलट चर्चा होत आहे.

जिंदाल रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाळ परमार व सहाय्यक वैद्यकीय अधिकारी असलेली त्यांची सुनबाई डॉ. कृतिका परमार या डॉक्टर जोडगोळीबद्दल रुग्णांकडून छोट्या-मोठ्या तक्रारी येत असतांनाच मंगळवार दि. ६ सप्टेंबरला ऐनघरचे उपसरपंच रोहिदास लाड सकाळी १०.३० वा.च्या सुमारास रुग्णालयात आपले ६५ वर्षीय वयोवृद्ध वडील नामदेव लाड यांना उपचारासाठी घेऊन गेलेले असतांना त्यांनाही वडिलांच्या उपचारात या डॉक्टर जोडगोळीकडून वाईट अनुभव आला होता. उपसरपंच रोहिदास लाड हे वडिलांसोबत असतांनाही यातील डॉक्टर कृतिका परमार यांनी त्यांच्याशी उद्धटपणाची भाषा वापरली होती. …/२

## शेतकऱ्यांसाठीच्या वचनपूर्ती बद्दल शिंदे फडणवीस सरकारचे अभिनंदन : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा करूनही महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षे त्यांची अंमलबजावणी केली नाही. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करून सात लाख शेतकऱ्यांना निधी दिला. शेतकऱ्यांसाठीच्या वचनपूर्तीबद्दल शिंदे - फडणवीस सरकारचे अभिनंदन, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (शुक्रवार, दि. २१) व्यक्त केली.



ते पुढे म्हणाले की, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षांपूर्वी केली होती व दोन अर्थसंकल्पातही त्याचा उल्लेख केला होता. परंतु, महाविकास आघाडी सरकारने याची अंमलबजावणी केली नाही. विरोधी पक्ष असताना भाजपने या विषयावर आंदोलनही केले होते. अखेर गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टी व बाळासाहेबांची शिवसेना युती सरकारने याची अंमलबजावणी सुरू केली व सहा लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात अडीच हजार कोटी रुपये सरकारने जमा केले. शिंदे - फडणवीस सरकारने पहिल्याच बैठकीत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला होता. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होण्यासाठी यावेळेस पहिल्यांदाच एका क्लिकवर निधी जमा करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी ही रक्कम जमा झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

परतीच्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या बाबतीत जिल्हा प्रशासनाने नुकसान …/२

## सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । महाड**

माहेराहून पैसे आणावेत यासाठी नवरा आणि सासू सासर्यांकडून होत असलेल्या छळाला कंटाळून २३ वर्षीय विवाहितेने गळफास घेवून आत्महत्या करण्याची घटना राजेवाडी येथे घडली. या प्रकरणी महाड शहर पोलिसांनी नवरा, सासू आणि सासरा अशा तिघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

प्रिया सतिश आर्डे असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. २०१७ मध्ये तिचा प्रतिश विलास आर्डे (वय ३१, रा. राजेवाडी, ता.महाड) याच्याबरोबर प्रेम विवाह झाला होता. तेव्हा-पासूनच प्रतिश, त्याचे वडील विलास आर्डे आणि सासू विजया आर्डे यांनी तिने माहेराहून पैसे आणावेत यासाठी तगादा लावून तिला मारहाण करत होते. या शारिरिक आणि मानसिक जाचाला कंटाळून १४ ऑक्टोबर रोजी तिने राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी वृषाली वाजेकर (रा. विन्हेरे, ता. महाड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार या तिघांविरूध्द भादंवि कलम ३०६, ३०४ ब, ४९८ अ आणि ३२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरिक्षक रेखा जगदाळे या करित आहेत.

## रायगड जिल्हा परिषदेत निवृत्तीला आलेले कर्मचारी अद्याप कायम नाहीत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्य शासन सेवेत प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन रुजु झाल्याच्या दिनांकापासुन तिन वर्षांच्या समाधानकारक सेवा पुर्ण झालेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायीत्व प्रमाणपत्र दिले जाते.

याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडुन दि.११.०९.२०१४ रोजी महत्वपुर्ण सुधारित शासन निर्णय निर्गमित झाला आहे .या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा स्थायित्व प्रमाणपत्र देणेबाबतचा सविस्तर शासन निर्णयात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की,राज्य कर्मचाऱ्यांना प्रथम नियुक्तीच्या पदावर तीन वर्षांच्या नियमित सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यास या प्रमुख शर्तीची पुर्तता करण्याऱ्या कर्मचाऱ्यास स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात येते .यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्याची नियुक्ती सेव-ाप्रवेश नियमानुसार व विहीत पद्धतीने झालेली असणे आवश्यक आहे .तसेच कर्मचारी सेवेत पात्र



असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्याचबरोबर कर्मचाऱ्यांने सेवाप्रशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .त्याचबरोबर कर्मचाऱ्याचा गोपनिय अहवाल, उपस्थिती, सचोटी चांगली असणे आवश्यक आहे .स्थायित्व प्रमाणपत्र हे प्रथम नियुक्तीच्या पदांकरीता दिले जाते.

सदर शासन निर्णयान्वये प्राधिकारी कार्यालयांकडुन प्रत्येक महिन्यांच्या दि.३० नोव्हेंबर पर्यंत ३ वर्षे पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचा अहवाल तयार करण्यात येतो. अशा कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षांच्या १५ डिसेंबर नंतर स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते .सदर स्थायित्वाची नोंद् मुळ सेवापुस्तकामध्ये करण्यात येते .याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा दि.११.०९.२०१४ रोजी काढण्यात आलेला आहे. परंतु रायगड जिल्हा परिषदेमध्ये कर्मचारी निवृत्तीला आलेले असताना अद्याप स्थायित्व प्रमाणपत्रापासुन वंचित आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद कर्मचा-यांना अनेक समस्याना सामोरे जावे लागत आहे.

बाबत अनेकवेळा रायगड जिल्हा परिषद अलीबाग येथे शिक्षक संघटना बैठकीवेळी मुद्दा चर्चेला आलेला असताना प्रत्येक तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र देणेविषयी सविस्तर कळविन्यात येवून सदर स्थायित्व प्रमाणपत्र यादी कार्योत्तर परवानगी साठी जिल्हा परिषेदेकड़े पाठविण्या बाबत आदेशित केले होते त्यानुसार सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी तालुक्यातील स्थायित्व प्रमाणपत्र यादी बनवून जिल्हा परिषद मुख्यालयाकडे कार्योत्तर परवानगी साठी पाठविण्यात आली असता जिल्हा परिषद मुख्यालयाकडुन आक्षेप घेवून त्यास मान्यता देण्यास नकार दिला.

त्यानंतर स्वतंत्र प्रस्ताव रायगड जिल्हा परिषदकड़े पाठविन्याबाबत गटशिक्षण अधिकारी यांना कळविण्यात आले. त्यानुसार कर्जत तालुक्यातील शिक्षकाना प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले. कर्जत तालुक्यातील शिक्षकानी ३ वर्षापूर्वी पंचायत समिति कर्जत येथे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यांच्यावर आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सप्टेंबर २०२२ मध्ये प्रस्तावासोबत मागील ३ वर्षापूर्वीचे गोपनीय अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार शिक्षकानी गोपनीय अहवाल पंचायत समिति कर्जत येथे केन्द्रप्रमुखा मार्फ़त सादर केले. परंतु ते अद्याप पंचायत …/२

## पालकांकडून अर्भकाला होणारा एचआयव्ही संसर्ग रोखण्यात शासन-प्रशासनास यश : सर्जेराव मस्के-पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळून आलेल्या महिलांना समुपदेशन व योग्य एआरटी औषधोपचार व बालकांना नेव्हीरपीन सिरप देऊन बालकांना होणारा एचआयव्ही संसर्ग टाळता येऊन बालकांच्या व महिलांच्या आयुष्यात नवचैतन्य निर्माण होऊन त्या सर्वांना जीवन जगण्याचे बळ मिळते. पालकांकडून अर्भकाला होणार एचआयव्ही संसर्ग रोखण्यात शासन-प्रशासनाचे काम समाधानकारक असल्याचे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांनी नुकतेच येथे केले.



जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय या विभागाची जिल्हा एड्स प्रतिबंध नियंत्रण समितीची, जीपा व एएमटीसीटी याबाबतची सन २०२२-२३ मधील प्रथम व द्वितीय सत्राच्या त्रैमासिक आढावा सभा रायगड जिल्हाधिकारी बैठक सभागृहामध्ये जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्या, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा …/२

## चिरनेर परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर गावासह चिरनेर परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत चालली असून, त्यांचे चावण्याचे प्रमाण वाढले आहे .ही भटकी कुत्री परिसरात जागोजागी करीत असलेल्या विष्ठेमुळे, चिरनेर गावात दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे ,सध्या पडत असलेल्या पावसामुळे या दुर्गंधीची परिस्थिती बिकट बनत चालली आहे.

भटक्या कुत्र्यांच्या अक्षरशः विष्ठेच्या दुर्गंधीमुळे येथील नागरिक त्रासले असून, परिसरात दिवसेंदिवस भटक्या आणि मोकाट कुत्र्यांची समस्या बिकट होत चालली आहे .याशिवाय भटकी कुत्री एकमेकांना चावून, जखमी होणार्या कुत्र्यांचीही संख्या वाढत आहे. त्यामुळे गावात रोगराई पसरण्याची भीती दिसत आहे .परिसरात मटन चिकन विकणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या मोठी आहे .व्यापारी कापत असलेल्या कोंबड्या बकऱ्यांची आतडी उघड्यावर टाकत



असल्यामुळे ही भटकी कुत्री त्याच्यावर ताव मारीत आहेत. त्यामुळे परिसरातील मानवी वस्त्यांमध्ये या भटक्या कुत्र्यांनी दहशत माजवली आहे. दरम्यान सकाळी शाळेत तर संध्याकाळी ट्युशनला जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, कळपाने फिरणाऱ्या या कुत्र्यांची, दहशत निर्माण झाली असून ,बाहेर पडताना या मुलांना धडकी भरते. चिरनेर श्री महागणपतीच्या मंदिर परिसरातील, भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, ही भटकी कुत्री मंदिर परिसरात विष्ठेची घाण करीत असल्यामुळे श्री महागणपतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तगणांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. याशिवाय टोलक्याने दबा धरून बसलेली ही कुत्री रस्त्यावरून चालणाऱ्या पादचारी नागरिकांच्या हातात असलेली, मटण मच्छीची पिशवी हातातून ओडबडून ,पळ काढीत आहेत. तर दुचाकी स्वराला गाठून त्याच्यावरही …/२

# भाजपा रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्षपदी महेश ठाकूर यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । धाटाव**

भारतीय जनता पार्टी रोहा तालुका युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी कोलाड विभागातील खमके नेतृत्व महेश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शिफारशीनुसार तर आमदार रविशेठ पाटील यांच्या सूचनेनुसार महेश ठाकूर (रा. पालेखुर्द)यांची रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.ठाकूर यांच्या नुकत्याच झालेल्या निवडीचे माजी आमदार अवधूत तटकरे, युवा नेते वैकुंठ पाटील यांसह भाजपा युवा कार्यकर्त्यनी अभिनंदन केले.विभागाला सक्षम नेतृत्व मिळाल्याने त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा रोह्याचे माजी नगराध्यक्ष अवधूत तटकरे यांनी नुकताच भाजपा मधे प्रवेश केला.त्यांच्या समवेत असंख्य कार्यकर्ते सुद्धा भाजपवासी झाले. या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये रोहा तालुक्यातील पालेखुर्द गावचे युवा नेतृत्व महेश ठाकूर यांनी सुद्धा प्रवेश केला.शेतकरी कुटुंबातील ठाकूर यांनी अथक प्रयत्नाने आपली चांगली छबी हळूहळू राजकारणात उमटवली आहे. राजकारणात सुरुवात करण्याआधी ते अनिल तटकरे यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले गेले.त्यानंतर त्यांनी एक माफी अवधूत तटकरे यांची साथ धरून कायम त्यांच्याच सोबत राहिले. रोह्यात विश्रामगृहात नुकत्याच झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी ठाकूर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

यासमयी भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष राजेश मापारा,रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांभेकर,युवा मोर्चाचे राजेश डाके,जयदीप तांबुटकर,नरेश कोकरे, वैभव कुलकर्णी,अविनाश कान्हेकर,कृष्णा बामणे,यज्ञेश भांड,सनल कुमार,आंनद लाड,शिवाजी पाटील,भाऊ शेलार,संजय लोटणकर सरचिटणीस श्रेया कुंठे याच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.युवा मोर्चाच्या रोहा तालुका अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल महेश ठाकूर यांचे माजी आमदार अवधूत तटकरे,युवा नेते वैकुंठ पाटील यांसह त्यांच्या असंख्य चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बी.सी. जिंदाल रुग्णालयातील त्या डॉक्टर वर कारवाई कधी?

त्यामुळे जर स्थानिक लोप्रतीनिधीच्या बाबतीत असे प्रकार घडत असतील तर इतर सर्वसामान्य व गरीब रुग्णांची काय अवस्था असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला होता.

त्यामुळे जिंदाल रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाळ परमार व सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. कृतिका परमार यांच्याकडून रुग्णांच्या बाबतीतील हलगर्जीपणामुळे भविष्यात जर कुणाचा नाहक जीव गेल्यास जिंदाल रुग्णालय व्यवस्थापन जबाबदार असेल. त्यामुळे या दोन्ही डॉक्टर्सना त्वरित हटविण्याची मागणी ऐनघर ग्रामपंचायतीकडून ७ सप्टेंबरला जिंदाल रुग्णालयास बजावण्यात आलेल्या एका लेखी तक्रारीनुसार करण्यात आली होती.

याप्रकरणी जिंदाल रुग्णालय व्यवस्थापनाला पुन्हा एकदा स्मरणपत्र पाठविण्यात आल्याची माहिती ऐनघरच्या सरपंच कलावती राजेंद्र कोकळे यांनी दिली. तर यासंदर्भात जिंदाल रूग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाल परमार यांची बाजू जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता मला विचारणारे हे पंचायत वाले कोण आहेत ? माझा संबंध जिंदाल व्यवस्थापनशी आहे. पंचायत वाले तिकडे आहेत आम्ही सुकेळीत आहोत. मला विचारणारे ते कोण ? अशा उध्दट शब्दात प्रस्तुत प्रतिनिधीजवळ प्रतिक्रिया व्यक्त करणारे हे डॉक्टर मग रुग्णांशी कसे वागत असतील याचा प्रत्यय पुन्हा एकदा आल्याने या डॉक्टरवर लवकरात लवकर कारवाई नाही झाली तर ऐनघर पंचक्रोशीतील जनता आंदोलनाचा पवित्रा घेणार असल्याचे समजते.

## शेतकऱ्यांसाठीच्या वचनपूर्ती बद्दल शिंदे फडणवीस सरकारचे अभिनंदन

झालेल्या भागाचे पंचनामे युद्ध पातळीवर करुन शेतकऱ्यांना मदत द्यावी, असाही आदेश सरकारने दिला आहे. शिंदे फडणवीस सरकार सातत्याने संकटग्रस्त शेतकऱ्यांना तत्परतेने मदत करत आहे, असेही त्यांनी सांगितले.राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र ग्रीबिझनेस नेटवर्क संस्थेस अनुदान स्वरूपात निधी देण्याचा निर्णय झाला. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे शक्य होणार आहे तसेच नाशवंत शेतीमालाचे काढणी पश्चात नुकसान कमी होणार आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगले दर मिळण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. या निर्णयाबद्दलही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सरकारचे अभिनंदन केले.

## रायगड जिल्हा परिषदेत निवृत्तीला आलेले कर्मचारी अद्याप कायम नाहीत

समितिकडे धूळ खात पडले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे त्यातीलच काही प्रस्ताव जिल्हा परिषेद कड़े पाठविण्यात आले असून त्याना मंजूरी सुद्धा मिळाली आहे.

कर्जत तालुक्यात ३०० च्या वर स्थायित्व प्रमाणपत्र न मिळालेल्या शिक्षकांची संख्या असताना केवळ काही ठराविक शिक्षकांचा प्रस्ताव जिल्हा परिषेद कड़े गेलाच कसा. हा प्रश्न कर्जत तालुक्यातील स्थायित्व प्रमाणपत्र न मिळालेल्या शिक्षकांसमोर पडला आहे. सदर बाबत अखिल रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे वरिष्ठ उपाध्यक्ष विजय जगताप यांनी तीव्र आक्षेप घेत याबाबत चौकशी करण्याची मागणी गटशिक्षण अधिकारी सुरेखा हिरवे यांच्या कड़े केली आहे. व कर्जत तालुक्यातील ज्या शिक्षकानी अटी व शर्ति पूर्ण केल्या आहेत व ज्यांची प्रथम नियुक्तिपासुन सलग ३ वर्ष समाधानकारक सेवा पूर्ण केली आहे. त्या सर्व शिक्षकाना त्वरित स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात यावे असे कळविले आहे.

## एचआयव्ही संसर्ग रोखण्यात शासन-प्रशासनास यश : सर्जेराव मस्के-पाटील

शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वंदनकुमार पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री.संजय माने, एआरटी नोडल अधिकारी डॉ.शीतल जोशी, एआरटी वैद्यकीय अधिकारी डॉ.नालंदा पवनारकर, जिल्हा सहाय्यक सौ.रश्मी सुंकले, प्रकल्प संचालक श्री.मनोज गावंड यांची उपस्थिती होती.

या सभेच्या संगणकीय सादरीकरणामध्ये जिल्हा एड्स नियंत्रण विभागाच्या वतीने एप्रिल २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत जिल्ह्यातील जनरल क्लायंटमध्ये ४६ हजार २०६ इतके उद्दिष्ट असून ६८ हजार ८४८ (१४९ टक्के) इतके एचआयव्ही समुपदेशन व तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये १८५ क्लायंट हे एचआयव्ही संसर्गित असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे या कालावधीमध्ये २६ हजार २३२ हे गरोदर मातांचे उद्दिष्ट असून २७ हजार ६१८ (१०५ टक्के) गरोदर महिलांची एचआयव्ही समुपदेशन व चाचणी करण्यात आली. यामध्ये ८ गरोदर माता एचआयव्ही संसर्गित असल्याचे आढळून आल्या आहेत.

या कालावधीमध्ये २१ बालकांची १८ महिन्याची एचआयव्ही तपासणी करण्यात आली असून २१ पैकी २१ बालके एचआयव्ही संसर्गित नसल्याचे आढळून आले. या मूल्यमापनावरून प्राथमिक अवस्थेमध्ये एचआयव्ही संसर्गित आईवडिलांकडून त्यांच्या मुलाला होणार एचआयव्ही संसर्ग १०० टक्के प्रतिबंध करता येतो, असे निदर्शनास येत आहे. म्हणजेच या राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमामध्ये शासनाला १०० टक्के यश येत आहे असे सिद्ध होते, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील यांनी केले.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांमध्ये एकूण १५ स्टॅन्ड अलोन आयसीटीसी असून एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे १ एचआयव्ही च्या तीन तपासण्या करणारी पीपीपी आहे. तसेच एक मोबाईल आयसीटीसीच्या माध्यमातून आदिवासी व अतिदूर्गम भागातील तसेच ट्रक ड्रायव्हर, स्थलांतरित कामगार, वेश्याव्यसाय करणाऱ्या स्त्रियांची देखील एचआयव्ही समुपदेशन व तपासणी केली जाते. तसेच ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र, ८ यूएचपी, २ ग्रामीण रुग्णालय, १ नगरपरिषद दवाखाना येथे एफआयसीटीसी तसेच ६८ खाजगी दवाखाने व लॅब या ठिकाणी सुविधा दिली जाते.

जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या ३ एआरटी केंद्रासह ११ लिंक एआरटी केंद्रामध्ये एकूण ८ हजार १०० प्रीएआरटी नोंदणी झालेली असून त्यापैकी ३ हजार ७६६ लोकांना एआरटी औषधोपचार सुरु करण्यात आलेला आहे. ही सुविधा पूर्णपणे मोफत दिली जाते.

एचआयव्ही संसर्गित व एड्स यामधील फरकः- एचआयव्ही ही विषाणू असून यामुळे याची लागण झालेल्या व्यक्तीची रोगप्रतिकारक क्षमता कमी होते. योग्य औषधोपचाराने यावर नियंत्रण ठेवता येते. या विषाणूचा प्रवेश शरीरात झाल्यानंतर जवळपास १५ ते २० वर्षानंतर त्या व्यक्तीला एड्स आजार होतो. आवश्यक काळजी घेऊन उपचार घेतल्यास याची देखील तीव्रता कमी करता येणे शक्य आहे.

या आढावा सभेच्या वेळी लोकपरिषद पनवेल, युनिट १, युनिट २, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेण, यांच्या लिंक वर्कर व ट्रकर्स प्रोजेक्ट उरण, आधार संस्था पनवेल, परिवर्तन प्रोजेक्ट पनवेल व सक्षम प्रोजेक्ट रोहा या संस्थांच्या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्ती, वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, टीएस, टीजी यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना शासकीय सेवा सवलती या एक खिडकी योजनामधून देता याव्यात याबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीस महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेण, प्रकल्प संचालक श्री.विजय नायर, आधार संस्था पनवेल, प्रकल्प संचालक श्री.अशोक गायकवाड, लोकपरिषद पनवेल, क्षेत्रीय व्यवस्थापक श्री.निलेश सकपाळ, साथी संस्था. मुंबई, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी श्री.प्रताप शिंदे, वैधकीय अधिकारी डॉ.सुरेश ठोकळ, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम संपदा मळेकर, प्रकल्प समन्वयक श्री.सुनील पटेल, एचआयव्ही, टीबी समन्वयक श्री.मनोज बामणे, श्रीमती शिल्पा हळणकर, श्रीमती मनिषा अहिवळे, श्री.कुणाल खुटवळ, सांची, सुरेश अय्यर हे उपस्थित होते. या बैठकीकरिता उपस्थित असणाऱ्या सर्व सदस्यांचे स्वागत तसेच आभार प्रदर्शन डापकूचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.संजय माने यांनी केले.

## चिरनेर परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत

हल्ला चढवीत आहेत. कुत्री करत असलेल्या विष्ठेच्या घाणीच्या दुर्गंधीमुळे येथील नागरिक व महिला वर्ग वैतागले आहेत .

भटक्या कुत्र्यांनी चावा घेण्याचे प्रकार सर्रास सर्वत्र घडत आहेत .कुत्र्याने चावा घेतल्यामुळे रेबीज नावाचा जीवघेणा रोग जडण्याची शक्यता असते. या घटनेची दखल घेऊन संबंधित प्रशासनाने अँटी रेबीज लसीकरणाची मोहीम राबवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत .

# तळवली तर्फे दिवाळी शाळेत किल्ले स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील प्रा.शाळा तळवली तर्फे दिवाळी शाळेत दीपावली सणाचे औचित्य साधून किल्ले स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

आपल्या देशाचा,राज्याचा तसेच जिल्ह्याचा इतिहास समजावा,तसेच गड-किल्ल्यांची माहिती व्हावी या उद्देशाने या शाळेत गेली अनेक वर्षे दीपावली सणाचै औचित्य साधून व दीप-ावली सुट्टीपूर्वी दरवर्षी किल्ले स्पर्धा आयोजित केली जाते.त्याच अनुषंगाने याही वर्षी येथे आयोजित केलेल्या किल्ले स्पर्धेत येथील चिमुकल्या ज्ञातांनी जवळपास वीस किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार केल्या. या स्पर्धेत प्रथम क्र.अंश जितिन सावंत इ..३ री,द्वितीय क्र.काव्या रोशन चव्हाण इ.१ली,तर तृतीय क्र. श्रावणी राकेश चव्हाण इ.३ री यांनी पटकावले.तर या चिमुकल्या बालकलाकार विद्यार्थीना प्रोत्साहन मिळावे यासाठी विजेते विद्यार्थी व सहभागी विद्यार्थी यांना तांबडी केंद्रप्रमुख विवेकानंद पोटे,उसर शाळेचे मुख्याध्यापक सुधीर पाटील,शा.व्य.समिती अध्यक्ष रोशन चव्हाण, उपाध्यक्ष जितीन सावंत,पोटे सर व अन्य ग्रामस्थ यांच्या हस्ते पारितोषिकं करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार येथील शिक्षक सचिन खेंगरे यांनी केले.

गोडसे साो

ॲड.राजेश बांगर

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश पनवेल रायगड यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.९०/२०२२

ने.ता.२३/११/२०२२

श्रीमती.वनिता संजय पाटील
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी कु.ध्रुव संजय पाटील यांचे खालील मिळकतीसंदर्भात अज्ञान पालक म्हणून घोषित करून मिळणेकरिता मा.न्यायालयात हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डीयनशिप ॲक्ट, १९५६ चे कलम ८ (२) (अ) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**अ) मिळकतीचे वर्णन**

| भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| वहाळ पुष्पक नोड | २५ ए | ३६५ | ४० |

वर नमूद मिळकतीसंदर्भात अर्जदार यांनी कु.ध्रुव संजय पाटील याचे अज्ञान पालक असल्याचा दाखला मिळण्याकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांस पालकत्वाचा दाखला देणेबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास पालकत्वाचा दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२१/१०/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**जिल्हा न्याया. पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्याया. पनवेल**

### Public Notice

This is to inform the public at large that We are Mr Manav Surinder Mehta & Mrs. Muskan Surinder Mehta.

Residence: Plot no 1, Road No 7, Sec 1, New Panvel (E), Navi Mumbai 410206. My Father Late Shri Surinder Gulshan Mehta expired on 15/5/2011.

We are the only legal heirs of our father and there's a pending Will Probate Petition of No 874/2011 in Senior Division Panvel Court.

We are not binding any transaction of Sale/ Purchase of any properties mentioned in the will. The said person should be held responsible

**Sd/-**
**Manav Surinder Mehta**
**7021145433**

अर्जदाराचे वकील
ॲड.श्री.एम.एम.मोकल

### जाहिर नोटीस

उरण येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.३०/११/२०२२

महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर
(मयत) तर्फे वारस
महंमद हसन महंमद अत्ताउल्लाह तुंगेकर
वय : ६० वर्षे, धंदा : ड्रायव्हर
रा.उरण म्यु. घर नं.३६४, हसन मंजिल,
पोलीस स्टेशन रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर हे दि.२२/०४/२०२१ रोजी त्यांचे राहते घरी मयत झाले. महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर यांस महंमद हसन अत्ताउल्लाह तुंगेकर हेच कायदेशीर वारस आहेत. याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार याने वक्फ बोर्ड औरंगाबाद यांचेकडे मयत ट्रस्टी महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर यांचे जागी वारसा हक्काने हजरत पीर साहेब दर्गा पाखाडी, नागाव व जामे मस्जिद उरण या संस्थेचे ट्रस्टी नेमणुककरिता अर्ज दिलेला आहे. सदर फेरबदल अर्जाचे कामी वक्फ बोर्ड औरंगाबाद चेअरमन यांनी दि.१५/०९/२०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार अर्जदार याने मयत महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर यांचे महंमद हसन अत्ताउल्लाह तुंगेकर हेच कायदेशीर वारस ठरवून तसा सर्टीफिकेट मिळावे असा कोर्टाकडे अर्ज दाखल केला आहे. सोबत अर्जाची प्रत जोडली आहे.

त्याअर्थी अर्जदार याचे वडील महंमद अत्ताउल्लाह महंमद हसन तुंगेकर यांना वर नमूद केलेले अर्जदार व्यतिरिक्त कोणी वारस असलेबाबत हरकती असल्यास त्या त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत मे.कोर्टात सादर करावी. अन्यथा मुदतीनंतर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल हे कळावे.

उरण
दि.१९/१०/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# झोपेत असलेल्या माणसावर अज्ञात इसमाने केला हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दारूच्या नशेत झोपेत असलेल्या माणसावर अज्ञात इसमाने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना पळस्पे ब्रिज परिसरात घडली आहे . स्वप्निल सहस्त्रबुद्धे ( वय २८ ) हे पळस्पे ब्रिज खाली दारूच्या नशेत झोपले असता कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात शस्त्रांच्या साहाय्याने त्यांच्या हातावर पायावर मारून त्याला जखमी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ॲड.राजेश बांगर

### जाहिर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग मा.न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.१२१२/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२५/११/२०२२

श्री.विश्वनाथ रामजी म्हात्रे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.६१, टाटा हॉस्पिटल रोड,
जामा मस्जिद जवळ, सेक्टर ३०,
ओवे गाव, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग
पनवेल महानगरपालिका,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून त्यांचे वडील कै.रामजी बामा म्हात्रे यांचा मृत्यू दि.२७/०३/१९७१ रोजी मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहते घरी झाला आहे. त्याबाबत अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे मागणीप्रमाणे त्यांच्या वडिलांचा मृत्यूचा दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दि.२५/११/२०२२ पर्यंतचे आत लेखी हरकत दाखल करावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांचे वडिलांचा मृत्यू दाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येतील याची दखल घ्यावी.

आज दि.२१/१०/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अब्दुलबर अब्दुल आहद मुल्ला, वय : २६ वर्षे, धंदा : व्यवसाय, रा.प्लॉट नं.५१/ ए २, वाजी मोहल्ला, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील नमूद केलेला भूखंड हा श्री.सरफराज मुश्ताक खान फ्लॅट नं.सी-विंग ६०३ बंदर रोड, पार्क प्लाझा, कच्छी मोहल्ला, ता.पनवेल, जि.रायगड यांना कायमस्वरुपी विक्री करण्याचे ठरविले आहे. विक्रीस काढण्यात येणाऱ्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : पनवेल, जिल्हा : रायगड**

| सिटी सर्व्हे नंबर | एकूण क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|
| ४०७ | ५३.५ |

कोणीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांना सदर भूखंडासंबंधी किंवा त्याच्या भागावर विक्री गहाणवट, लियन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्टार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्यांकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावी, आणि तेस केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनातून मुक्त आहे असे मानण्यात येईल आणि आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.दिपक एम. ठाकूर**
**शॉप नं.०९, पवन अपार्टमेंट,**
**अशोक बाग जवळ, लोखंडीपाडा,**
**पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८१९८८८१७०४**

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मुळ भूखंड मालक १) श्री.नंदकिशोर नाथा पाटील, २) प्रतिक्ष संजय पाटील यांचे ताबा कब्जात व वहिवाटीत नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड आहे. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

भूखंडाचे वर्णन
नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड

| भुखंड मालकाचे नाव | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १) श्री.नंदकिशोर नाथा पाटील २) प्रतिक्ष संजय पाटील | केओपी-आयसी ओजीडी-११० | आर-४ | ६८ | २७० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडामधील अविभाज्य हिस्सा |

सदर आमचे पक्षकार प्रतिक्ष संजय पाटील यांनी वर वर्णनाचा भूखंड क्षेत्र २९० चा.मी. क्षेत्रापैकी (१३५ चौ.मी. क्षेत्र) यांचा असलेला अविभाज्य हिस्सा आमचे पक्षकाराचे वडील १) श्री.संजय शंकर पाटील यांना बक्षिस पत्राद्वारे देणार आहेत. तरी सदरू मिळकतीवर / भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे / भूखंडाचे बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत. व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.संगम राम घरत**
**रा.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल,**
**जि.रायगड, पिन नं.४१०२०६**
**मो.नं.९९२०७००७०८**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ॲब्युलन्स मधून डिझेलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उभी करून ठेवलेल्या ॲब्युलन्स मधून अज्ञात चोरट्याने १०० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना शहरात घडली आहे .

शहरातील पनवेल उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उभी करून ठेवलेल्या ॲब्युलन्स मधून अज्ञात चोरट्याने १०० लिटर डिझेल ज्याची किंमत ९ हजार रुपये इतकी आहे . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## मानवता फाऊंडेशन च्या राष्ट्रीय सचिवपदी समाजसेविका अजिता कुमठेकर यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनेवल**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या मानवता फाउंडेशन च्या राष्ट्रीय सचिवपदी समाजसेविका अजिता कुमठेकर यांची नियुक्ती अध्यक्ष संजय पवार यांनी नियुक्ती पत्र देऊन केली आहे .

मानवीय मूल्यांचे रक्षण करून सामाजिक कार्यात अग्रेसर संघटना असलेल्या मानवता फाउंडेशन च्या राष्ट्रीय सचिव पदी समाजसेविका अजिता कुमठेकर यांची नियुक्ती करण्यात आली , या वेळी अध्यक्ष संजय पवार, महिला अध्यक्षा स्वाती पांचाल आदी उपस्थित होत्या.

## कॉपर वायंडिंग व ऑइलची अज्ञात चोरट्याने केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील साईनगर रोड परिसरात असलेल्या एका ट्रान्स्फॉर्मर मधून कॉपर वायंडिंग व ऑइल ची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे .

साईनगर रोड परिसरात असलेल्या एका ट्रान्स्फॉर्मर मधून कॉपर वायंडिंग व ऑइल ची चोरी ज्याची किंमत जवळपास ३ लाख १० हजार रूपये इतकी आहे . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

# कुंभे येथिल उंच कड्यांवर अचानक पडलेल्या ड्रोनचा जिद्दीने शोध घेतला असता तो सापडला

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

ऑक्टोबर २०२२ शनिवारचा दिवस होता, वन्यजीव अभ्यासक छायाचित्रकार शंतनु कुवेसकर आपल्या जंगलफेरी निमीत्त मुंबईचे पर्यटक राम प्रसाद यांना सोबत घेऊन त्यांना नविन ड्रोन कॅमेरा उडविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी तालुक्यातील सुमारे एक हजार मिटर उंचीवरील कुंभे येथील निसर्ग संपन्न मोकळ्या डोंगर माथ्यावरील पठारावर गेले होते. एका बाजुला प्रचंड खोलदरी तर अधुन मधुन उंच कडे शिखरे होती. या ठिकाणी पर्यटक प्रसाद यांचे नविन ड्रोन उडवुन यशस्वी फ्लाइट पूर्ण केले. त्यानंतर राम प्रसाद यांनी शंतनुला त्याच्याकडिल नविन कॉम्पॅक्ट ड्रोन उडविण्याचा आग्रह केला तीन तासाच्या ट्रेनिंग मुळे थकल्याने व उशिर होत असल्याने, तसेच ढगाळं सावट वातावरण असल्याने केवळ प्रसाद यांच्या आग्रहाखातर शंतनुने ड्रोन कॅमेरा उडविला. आणि बघता बघता सात आठशे फुट उंच आकाशात झेपावलेल्या ड्रोन कॅमेरॅत आजुबाजुचा नयनरम्य परिसर उंचकडे धबधबे याचे चित्रीकरण करत असतानाच अचानक ड्रोनची जिपीएस सिस्टीम बंद पडुन ड्रोन जवळील दरितील उंच कड्यावर पडला गायब झाला.

शेवटचे दृष्य मोबाईल मध्ये कैद झाले. त्यामध्ये ड्रोन उंच कड्यावर उलटा पडल्याने



गवताचा उलट दिसणार तांडा आणि आकाश दिसत होते. दुपारी साडेतीनची वेळ ढगाळ सावट आणि धुक्यात हा ड्रोन हरविला. शंतनुला काही सुचेनां त्याने दुसऱ्या ड्रोनच्या सहाय्याने आपला क्रॅश झालेल्या ड्रोनचा शोध घेतला व एवढ्या अवघड ठिकाणी त्याचा शोध घेणे जवळपास अशक्यच होते.

परंतु नाऊमेद न होता शंतनुने त्याचा शोध घेण्यासाठी आपल्या ग्रामिण भागातील मित्रांना ही घटना सांगितली या मित्रांनी या डोंगर कड्यांवर शोध प्रयत्न केला. परंतु मोठी जोखीम नको म्हणुन अखेर शंतनुने तज्ञ सराव असलेल्या पुणे येथिल अनंत मरगळे, तुषार होले, विकी जोरकर या गिर्यारोहकांची माहीती मिळविली आणि त्यांच्या मदतीने अखेर ड्रोनक्रॅश घटनेच्या दहादिवसांनी म्हणजे सोमवार दि.१० ऑक्टोबर रोजी दुपारी सहा तासाच्या अथक ,थरारक शोध मोहीमेत शंतनुचा नवाकोरा ड्रोन, साधा ओरखडा वा कोणताही पंख, कॅमेरॅला इजा न होता सहिसलामत सापडला. या कड्यांवर पहिल्यांदाच असे रॅपलिंग करण्यात आले.

दहा दिवसात पडलेला पाऊस, ऊन, वारा, धुक्यात पडलेल्या ड्रोनची बॅटरी मात्र संपूर्ण उतरली. मौल्यवान ड्रोन हरविल्याने शंतनु व त्याचे आई, वडिल, आजी काहीसे नाराज झाले, पण त्यांनी शंतनुस समजावले चिंता करु नकोस ! मात्र शंतनुचे मन काही मानेना, त्याने जिद्दीने ड्रोनचा सतत शोध घेतला, अन् चमत्कारच घडला.

अनोळखी अडचणीच्या ऊंच ठिकाणी ड्रोन सापडला! याप्रसंगी तीन हजार फूट उंच कड्यावर शंतनुस आकाश ठेंगणे झाले, आता पुन्हा एकदा नव्या जोमाने शंतनुच्या स्वकष्टाचा मेहनतीने मिळविलेला ड्रोन पुन्हा आकाशात भरारी घेण्यास सज्ञ झाला आहे. आपली मेहनत जिद्द, चिकाटीने हा ड्रोन स्वतः दुरुस्त करुन, या घटनेत ड्रोनची बॅटरी मात्र नुकसानग्रस्त झाली, वन्यजीव अभ्यासक, छायाचित्रकार म्हणुन रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यात शंतनुने केलेला पर्यावरण विषयक अभ्यास, संशोधन करताना त्याला आलेल्या अनुभवांच्या शिदोरीत मात्र या दहा दिवस हरविलेल्या नव्या कोऱ्या ड्रोन क्रॅश घटनेची चित्तथरारक आठवण कायमस्वरुपी कैद झाली आहे. या शोध मोहिमेत शंतनुला प्रोत्साहन देणारे मित्र सुरज बांगर, स्वप्निल खाडे, दिपेश सुतार, केतन फुलपगारे, रामदास येनपुरे यांना शंतनुने मनापासुन धन्यवाद दिले.

# नुकसानग्रस्त पिक विमाधारक शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती ७२ तासाच्या आत विमा कंपनीस कळविणे आवश्यक

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोंकण विभागात होणारा सततचा अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे या विभागातील नुकसानग्रस्त विमाधारक शेतकऱ्यांनी त्यांच्या सर्वे नंबर नुसार बाधित पिक व बाधित क्षेत्रा बाबत नुकसानाची माहिती घटना घडल्यापासून ७२ तासाच्या आत संबंधित विमा कंपनीस कळविणे आवश्यक असल्याचे कोंकण विभागीय कृषी सहसंचालक यांनी कळविले आहे.

कोकण विभागातील रायगड व पालघर जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना ही भारतीय कृषी विमा कंपनी तर ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात युनायटेड इंडिया इन्शुरन्स क.लि. या विमा कंपन्याकडून राबविण्यात येत आहे. कोंकण विभागात सध्या भात, नाचणी व उडीद पिकांच्या कापणीला सुरुवात झाली असून सततचा अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे नुकसान होऊ शकते. पिक नुकसानीबाबतची पूर्वसूचना केंद्र शासनाने विकसित केलेल्या Crop Insurance app किवा विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालये, विमा कंपनीचा ई-मेल, संबंधित बैंक किंवा कृषी/ महसूल विभाग या द्वारे देण्यात यावी. रायगड व पालघर जिल्हयातील शेतकऱ्यानी भारतीय कृषी विमा कंपनी (टोल फ्री क्र.१८००४१९५००४) तर ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयासाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि(टोल फ्री १८००२३३५५५५) या विमा कंपन्याच्या टोल फ्री क्रमांकाचा वापर करावा. पीक कापणी करून सुकण्यासाठी ठेवलेले असताना कापणीपासून जास्तीत जास्त दोन आठवड्यापर्यंत(१४ दिवस) गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे पडलेला पाऊस व अवकाळी पाऊस यापैकी जे कारण असेल ते नमुद करून नुकसानीची माहिती देणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईसाठी तक्रार नोंदवतांना योग्य ती खबरदारी घेऊनच नुकसानग्रस्त क्षेत्राची नुकसान पूर्वसूचना विहित कालावधीत नोंदवावी असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक श्री. अंकुश माने यांच्याकडुन करण्यात येत आहे.

# चेतन्य सेवा संस्थेतफै वसुबारस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । महाड**

दिपावली उत्सवाची सुरुवात अर्थात वसुबारस गोमातेच पूजन करून होय शुक्रवारी सायंकाळी महाड मधील चेतन्य सेवा संस्थे माफैत हा उत्सव महिला भगिनीनी मोठ्या उत्साहात साजरा केला

महाड मधील चेतन्य सेवा संस्था ही एक सामाजिक संस्था असून संस्थेचे अध्यक्ष संस्थापक असणाऱ्या चेतन दादा उतेकर यांच्या संकल्पनेतून गेली अनेक वर्ष महाडमध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात त्याला महाडकरांकडून फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभतो

प्रति वर्षा प्रमाणेयाही शहरांतील छत्रपती शिवाजी चौक येथे शहरातील अनेक माता भगिनीनी वसुबारस म्हणून गोमातेच भक्तिभावात तेवढ्याच श्रध्देनेने एकत्रित पूजन केले चेतन्य सेवा संस्थेमार्फत वसुबारस साजर करण्याच हे १६ व वर्ष आहे तर प्रतिवर्षी याच ठिकाणी १५ ऑगस्ट स्वातंत्र दिनी भारत मातेच पुजन आणि इतर सामाजिक कार्यक्रम राबविले जातात.

हा कार्यक्रम यशस्वि व्ह-ावा म्हणून चेतनदादा उतेकर यांच्यासह दिपक चव्हाण पंकज उमासरे इश्वर पटेल जयपाल रावळ चंद्रहास नगरकर संकेत वडके राकेश शहा प्रमोद उतेकर दिनेश पटेल कमलेश जैन दिपक पटेल प्रदिप दळवी आदीनी मेहनत घेतली.

# वीर आदिवासीवाडीच्या दिवाळीत हिरवळच्या विद्यार्थ्यांनी भरले रंग

**दै.रायगड नगरी । महाड**

हिरवळ प्रतिष्ठानच्या माध्यमातून चालविण्यात येणारी हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट ही संस्था विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच देत नाही. तर देशाचे आदर्श नागरिक म्हणून त्यांना घडविण्याचे काम देखील करते. आपला विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग, पर्यावरण, सामाजिक बांधिलकी याबाबत जागरुकता असावी यावर हिरवळने नेहमीच कटाक्ष ठेवला आहे. या विद्यार्थ्यांमध्येही याबाबतच्या भावना किती खोलवर रुजल्या आहेत, त्याचे प्रत्यंतर वीर आदिवासी वाडीवर त्यांनी केलेल्या कामांतून आले आहे.

वीर आदिवासी वाडी ही जेमतेम दहा घरांची वाडी. मासेमारी आणि शेतीवर मजुरी यावरच या वाडीवरील नागरिकांचा उदरनिर्वाह चालतो. तुटपुंज उत्पन्नामुळे कधी कोणत्या सणांचा आनंद त्यांना घेता येत नाही की सणावाराला घराची रंगरंगोटीही करणे त्यांना शक्य नव्हते. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संगणक शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या परिने त्यांची ही दिवाळी आनंददायी व्हावी यासाठी एक पाऊल पुढे टाकले. गेल्या अनेक वर्षांपासून, या आदिवासी वाडीवरील घरांना रंग दिला गेला नव्हता. यावर्षी हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरांना रंग लावून त्यांना दिवाळीचा आनंद दिला आहे. केवळ घरांची रंगरंगोटी न करता या आदिवासी वाडीमध्ये स्वच्छता मोहिम राबवून या वाडीचे रूपही या विद्यार्थ्यांनी बदलून टाकले आहे.



---

मा.इंदलकर साहेब यांच्या कोर्टात

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज १२०८/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२५/११/२०२२

सौ.पारुबाई हाशा परदेशी
उर्फ पारुबाई अंबाजी ढमाले
वय : ६४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.दिघोडपाडा उरण, पनवेल रोड, चिंचपाडा जवळ,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

जन्म मृत्यू अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सौ.पारुबाई हाशा परदेशी उर्फ पारुबाई अंबाजी ढमाले वय : ६४ यांचा जन्म दि.०१/०६/१९५८ रोजी राहत्या घरी मु.वडघर चिंचपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड या ठिकाणी झाला होता. अर्जदार सौ. पारुबाई हाशा परदेशी उर्फ पारुबाई अंबाजी ढमाले यांची जन्माची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू सौ.पारुबाई हाशा परदेशी उर्फ पारुबाई अंबाजी ढमाले या वर नमूद ठिकाणी जन्म झालेले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल. आज दि.२१/१०/२०२२ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

गोडसे सो

प्रोसेस जमा रु.५०/- — वकील श्री.एस.आर.चंद्रे पनवेल, नवी मुंबई

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४९२/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०२/१२/२०२२

ज्यापेक्षा कै.रामा उर्फ देहू बालू लबडे रा.मौजे : खानावळे गाव, पो.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड हे ४५ वर्षापूर्वी राहत्या घरी मयत झाले. अर्जदार नं.१) श्रीमती.राधाबाई गोविंद लबडे, २) श्रीमती. जनाबाई राजाराम म्हसे / जनाबाई गोविंद लबडे, ३) श्री.नामदेव गोविंद लबडे ४) श्री.संजय गोविंद लबडे ह्यांनी या कोर्टास सदरहू मयत कै.रामा उर्फ देहू बालू लबडे यांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. कै.रामा उर्फ देहू बालू लबडे यांचे नांवे असलेली मिळकत पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**Details of the Property**

**Agricultural land within the local limits of village Khanavale, Taluka-Panvel, District-Rigad bearing Survey No.40 admeasuring o H. 61.50 R and valuation thereof is Rs. 1.16 paise.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१ माहे ऑक्टोबर सन २०२२

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : देवद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची घर मिळकतीचे विकसन करण्याचे आमचे अशिल मेसर्स जे.एस.लाईफ ॲण्ड स्पेस भागीदारी संस्था यांनी विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : देवद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| घर मालकाचे नाव | ग्रामपंचायत मिळकत / घर नं. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| श्रीमती.मंदा मधुकर लहाने | १२७ | दगड विटा व पक्के कैलारु घर | ६४.१ |

वरील नमूद जुन्या घर मिळकतींवर व खुल्या जागेवर एकत्रितरित्या तळमजला अधिक मजली इमारतींचे बांधकाम करणेसंबंधीचा विकसन करारनामा

सबब वर नमूद घर मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर घर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रसाद वाकडीकर**
**फ्लॅट नं.००१, श्री साईप्रसाद को. ऑप.हौ.सो.सारस्वत बँकजवळ, प्लॉट नं.९८/२, स्वामी नित्यानंद रोड, ठाणा नाका, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६**
**मो.नं.९९२०१०४०११**

---

मा.वाघमारे सो

ॲड.ओमप्रकाश जाधव

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात

चौकशी अर्ज क्र.१०३७/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२४/११/२०२२

१) श्रीमती.पुजा प्रकाश पालांडे
२) श्री.प्रज्योत प्रकाश पालांडे
३) कु.प्रतिक्षा प्रकाश पालांडे
४) श्रीमती.सुमतीबाई धाकटू पालांडे — अर्जदार

विरुद्ध

निरंक — सामनेवाला

अर्जदार क्र.१ ते ४ घर नं.९१५, शिव मंदिर, पापडीचा पाडा, तळोजा मजकूर, तळोजा, पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०८

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील तसेच अर्जदार क्र.४ यांचा मुलगा कै.प्रकाश धाक्टोजी पालांडे यांचा मृत्यू दि.२५/०३/२०२२ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कळंबोली येथे झाला. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**प्रतिक्षा अपार्टमेंट, इमारत क्र.२६१, प्लॉट क्र...., सेक्टर क्र. TPPPG, तळोजा पाचनंद, पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सांकेतिक क्र. | भोगवटादाराचे नाव | गाळा/सदनिका नं. |
|---|---|---|---|
| १ | TPPPG261001 | प्रतिक्षा अपार्टमेंट | |
| २ | TPPPG261002 | प्रतिक्षा अपार्टमेंट | |
| ३ | TPPPG261003 | प्रतिक्षा अपार्टमेंट | |
| ४ | TPPPG261004 | प्रतिक्षा अपार्टमेंट | |
| ५ | TPPPG261005 | प्रतिक्षा अपार्टमेंट | |
| ६ | TPPPG2610A1 | प्रकाश धाक्टोजी पालांडे | |

मिळकतीचे मुल्यांकन................/-

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/१०/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.गुन्नाल साहेब कोर्ट

ॲड.तृप्ती ग. पाटील

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३७६/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०८/११/२०२२

कै.नंदकुमार अनंत वर्तक (मयत तर्फे वारस)
१) ज्योती नंदकुमार वर्तक, वय : ६८ वर्षे
२) प्रगती नंदकुमार वर्तक, वय : ३५ वर्षे
अर्जदार क्र.१ व २ यशोपुरम वर्षा को.ऑप.हौ.सोसा.,
ए विंग, पहिला माळा, रुम नं.१०४, के.वि.कन्या
विद्यालयाचे समोर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII) प्रमाणे, वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु.४,८०,०००/-

मे.कोर्टास अर्जदार तर्फे अर्ज विनंतीपूर्वक असा की,

१) अर्जदार यांनी सदरचा चौकशी अर्ज वारसदाखला मिळणेकरिता मे.कोर्टात दाखल केला आहे. सदरहू अर्जदार यांचे वडील नंदकुमार अनंत वर्तक हे दि.१६/०२/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयत व्यक्तीची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही मयत व्यक्तीची मुलगी आहे. सदर मयताचा मृत्यूचा दाखला सदर अर्जासोबत दाखल करीत आहे. अर्जदार हे मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस आहेत. मयत नंदकुमार अनंत वर्तक यांची आई रेखा अनंत वर्तक या दि.२/५/१९८४ रोजी गिरगांव मुंबई येथे मयत झालेल्या आहेत.

२) सदरहू अर्जदार यांचे वडील कै.नंदकुमार अनंत वर्तक ह्यांचे नावे दि.२१/०३/२००३ रोजीच्या ॲग्रीमेंट फॉर सेलचे अर्जात उल्लेखित मिळकत ही मयताचे नावे हस्तांतरीत करण्यात आलेली होती.

३) मयत व्यक्तींचे अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत. कै. नंदकुमार अनंत वर्तक यांना त्यांचे मृत्यूचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही इतर वारस नाहीत. मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असणाऱ्या खालील वर्णनाच्या काही मिळकती आहेत. त्याचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**यशोपुरम वर्षा को.हौ.सोसायटी लिमिटेड**
**अे विंग, पहिला माळा, रु.नं.१०४,**
**के.वि.कन्या विद्यालयाचे समोर**
**कारपेट एरिया ३०९ स्क्वे.फुट**
**सिटी सर्व्हे नंबर १३९८/१४०२ बी,**
**अंतिम भूखंड क्र.१२९ अे**
**ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

सदर मिळकत ही मृत्यूसमयी अर्जदार यांचे वडील कै.नंदकुमार अनंत वर्तक यांचे नावे होती व आहे. सदरील मिळकत ही अर्जदार यांचे वडील कै.नंदकुमार अनंत वर्तक यांचे नावे दि.२१/०३/२००३ रोजीचे पवल ६९२/२००३ नोंदणीकृत ॲग्रीमेंट फॉर सेलने कै. नंदकुमार अनंत वर्तक यांचे नावे आलेली आहे. ॲग्रीमेंट फॉर सेलमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मयत कै.नंदकुमार अनंत वर्तक यांचे नावे मिळकत आलेली आहे.

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## बस मधील डीझेलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पाडेघर गाव परिसरात बसचा टायर फुटल्याने बस उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर बस मधील डीझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे .

बस चालक प्रमोद धावारे याने त्याच्या ताब्यातील बसचा टायर फुटल्याने सदर बस पाडेघर गाव परिसरात उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर बसच्या डीझेल भरण्याच्या टाकीचे लॉक तोडून आतील २०० लिटर डीझेल ज्याची किंमत जवळपास १८ हजार रुपये इतकी आहे ते चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## पोलीस नाईक हिंदुराव कदम यांची हवालदार पदी बढती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाणे येथील पोलीस नाईक हिंदुराव शिवाजीराव कदम यांना हवालदार पदी बढती मिळाली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनश्री पवार, पोलीस उपनिरीक्षक बबन सांगळे यांनी हिंदुराव कदम यांच्या खांद्यावर फित लावून त्यांचा गौरव केला.

सन २००६ पासून हिंदुराव कदम हे पोलीस दलात कार्यरत असताना त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालय नवी मुंबई, कळंबोली, वाशी या ठिकाणी पोलीस दलात कार्यरत राहून मान मिळवला आहे. दाखल गुन्ह्यांचा तपास, आरोपीचा शोध व अनेक बक्षीस मिळवून पोलीस दलाची शान वाढवली. हिंदुराव कदम यांना उत्तम शेतीचे ज्ञान असून त्यांनी मूळ गावी १ हजार सीताफळ झाडांची लागवड करून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. हिंदुराव कदम यांच्या बढतीबाबत त्यांच्यावर मूळ गाव शिंदी खुर्द ग्रामस्थ, मुंबईकर परिवार, मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बालविवाह मुक्त भारत अभियानाला रायगड जिल्ह्यात उदंड प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पेण**

नोबेल शांती पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांच्या पुढाकाराने संपूर्ण देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियान राबवले जात आहे. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातून कॅण्डल रॅली काढून बालविवाह मुक्त भारत अभियान जनजागृती करण्यात येत आहे. सदर रॅलीत महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला.

पेण येथील महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था पेण, सोहम फाउंडेशन, पनवेल व सोशल एम्पावरमेंट अँड व्हालेंटरी असोसिएशन, मुंबई (डएत– ) यांच्या माध्यमातून १६ ऑक्टोबर पासून हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पनवेल, पेण, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग, सुधागड, माणगाव, रोहा, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, महाड, पोलादपूर,




आणि तळा तालुक्यात तसेच माणगाव येथील मिरगुंड आदिवासी वाडी, खालापूर येथील खरीवली आदिवासी वाडी, उरण येथील चिरनेर आदिवासी वाडी अलिबाग येथील किहिम आदिवसीवाडी व विविध शाळा कॉलेजमधून कॅन्डल मार्च रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

संपूर्ण देशात बाल विवाह प्रथा नष्ट व्हावी या हेतूने हे अभियान सुरू झाले आहे. बालविवाह प्रथा करू या नष्ट, 'पहिले पढाई, फिर बधाई', 'चलो अब शुरुवात करे बालविवाह को नष्ट करे' असे नारे देत प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

बालविवाह बाबतच्या कायद्याची अंमलबजावणी व महत्त्व पालकांना पटवून देण्यात येते. रॅलीची सांगता भारत बाल विवाह मुक्त बनावा ही शपथ सर्व पालकांना देऊन करण्यात येते.

महाराष्ट्र समाज विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मनोज गावंड यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम समन्वयक पंकज पाटील व संस्थेचे कर्मचारी वर्ग, सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजिरी मुळे व त्यांचे सहकारी, सामाजिक कार्यकर्ते, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, बचत गटांच्या महिला सदरचे अभियान यशस्वी करण्याकरिता मेहनत घेत आहेत.

# खा.सुनिल तटकरे यांनी घोणसे घाट अपघात स्थळाची केली पहाणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिघी–पुणे राष्ट्रिय मार्गावरील माण–गाव म्हसळा हद्दीतील घोणसे घाटातील शेवटच्या तीव्र उतार वळणावर नवीन पर्यायी मार्ग व्यवस्था करण्यात आली असतानाही एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होण्याच्या घटना सातत्याने घडत असतात.घाट अपघात स्थळी चुकीचा बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याने रस्त्याची पुन्हा दुरुस्ती करुन मिळावी यासाठी स्थानिक नागरीक, सर्व पक्षीय लोकप्रतीनिधी आणि पत्रकार यांनी रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या निर्दशनास आणून दिले होते.



खासदार तटकरे यांनी याची तातडीने दखल घेत रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे समावेत एम.एस.आर. डी.सी.आणि संबंधीत खात्यांचे शासकिय अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन घाट रस्ता दुरूस्ती करण्याचे आदेश दिले असता येथे लागलीच कार्यवाही करण्यात येत आहे.दिनांक २१ ऑक्टोंबर २०२२ रोजी खासदार तटकरे यांनी म्हसळा तालुका नियोजीत दौऱ्यात घोणसे घाट अपघात स्थळाची प्रत्यक्ष पाहाणी केली असता अपघात स्थळावर नेमक्या कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत त्या सुधारणा करणे बाबत आपण पाठपुरावा करू असे सांगतानाच घाटात या पुढे शुन्य अपघात होईल याची दक्षता घेतली जाईल.

या घाटात अपघात होतात म्हणुन घोणसे गावाचे नाव महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले असले तरी या पुढे येथे अपघात होऊ नयेत मात्र गावाचा शास्वत विकास करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन घोणसे ग्रामस्थांना देण्यात आले.घोणसे घाट अपघात स्थळाची खासदार सुनिल तटकरे पाहाणी करताना त्यांचे समावेत तालुका अध्यक्ष समीर बनकर,जिल्हा परिषद माजी सभापती बबन मनवे,प.स.माजी सभापती छाया म्हात्रे, उपसभापती मधुकर गायकर,संदीप चाचले,सरपंच अनिल बसवत,संतोष नाना सावंत आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# बोर्लीपंचतनमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती रॅली

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील दिघी सागरी पोलीस ठाणेकडून सायबर साक्षर गाव अभियानांतर्गत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत विद्यार्थ्यांनी सहभाग घेत सोशल मीडियाचा वापर करताना नागरिकांना सतर्कतेचा संदेश दिला.

दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने सायबर साक्षर गाव अभियानांतर्गत गुरुवारी बोर्लीपंचतन येथील श्री मोहनलाल सोनी विद्यालय, श्री नानासाहेब कुळकर्णी कनिष्ठ महाविद्यालय तसेच डॉ. ए. आर. उंड्रे हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी रॅलीत सहभाग घेत नागरिकांना आवाहन केले. कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून मोबाईल मध्ये लिंक किंवा अप्लिकेशन ओपन करू नये, सोशल मीडियाचा वापर करताना प्रत्येक नागरिकांना सतर्कता बाळगावी असा संदेश या रॅलीतुन देण्यात आला.

शहाराप्रमाणे आता ग्रामीण भागातून दिवसेंदिवस वाढता संगणक व इंटरनेटचा वापर आणि त्या अनुषंगाने सायबर गुन्ह्यांमध्ये होणारी वाढ ही चिं–ताजनक बाब आहे. या गुन्ह्यांना अनेकजण कळत–नकळत बळी पडत आहेत. सायबर गुन्ह्यांचे लक्ष्य होऊ नये म्हणून अधिकाधिक सतर्कता बाळ–गणे हाच यावर उपाय आहे, अशी माहिती दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संदीप पोमन यांनी यावेळी दिली. सायबर गुन्हे रोखण्यासाठी बोर्लीपंचतन येथील जनजागृती रॅली सोबत ग्रामपंचायतकडून देखील आव्हान करण्यात आले.

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी दूरवरून आलेल्या रुग्णांची घोरनिराशा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत साठ किलोमीटर अंतरावर दूरवरून कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आलेल्या रुग्णांना दिवसभर ताटकळत राहून रिक्त हस्ते जावे लागल्याने घोरनिराशेमुळे जिल्हा रुग्णालयाच्या गल–थान कारभाराचा प्रत्यय आला ! याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ .विकासीनी चव्हाण यांनी याप्रकरणी चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी जिल्हा शल्यचिकित्सक यांना निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुड तालुक्यातील दूरवर साठ किलोमीटर असलेल्या आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी तीन रुग्णांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आणले होते.परंतु याठिकाणी दिवसभर या रुग्णांना ताटकळत ठेवून शेवटी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया न करताच पाठवून देण्यात आले.त्यामुळे रुग्ण तसेच सोबत असलेले नातेवाईक, वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागला आहे.

याप्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी जातीने लक्ष घालून चौकशी करून दोषींवर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.विकासीनी चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले घोणस जातीच्या सापाला जिवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड शहरातील भंडारवाडा बाजारपेठ येथिल प्रशांत कासेकर यांच्या घराच्या मागील वाडीत अती विषारी जातीच्या ४.५ फुट लांबीच्या सापाला सर्प मित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनखात्याच्या सहाय्याने जंगलात जाऊन सोडून जिवदान दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे !

मुरूड शहरातच बाजारपेठ प्रशांत कासेकर यांच्या घराच्या मागील वाडीत मांजराने लक्ष वेधून घेतले असता ही बाब सुवर्णा कासेकर यांच्या लक्षात आली काहीतरी मोठा सर्प आहे. त्यावेळी घरच्यांना सावध करुन प्रशांत कासेकर यांनी सर्पमित्र संदीप घरत यांना तात्काळ घटनास्थळी घेऊन आले.

जबरदस्त आक्रमक भूमिकेत असलेल्या या घोणसला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनविभागाच्या सहकार्याने जवळील जंगलात सोडून जिवदान दिल्याने परीसरातून कौतुक केले जात आहे.

# पनवेल मध्ये अभ्यंग स्नानाला प्रचाराच्या उटण्याचा सुगंध पणत्या उटणेचे भावी नगरसेवकांकडून घरपोच वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर पाच वर्षानंतर विविध राजकीय पक्षांना आपल्या मतदारसंघातील मतदारांची आठवण झालेली दिसून येत आहे. दिवाळी सारख्या जल्लोष साजरा करणाऱ्या सणांमध्ये मतदारांच्या घरपोच पणत्या ,सुगंधी उटणे व आपल्या कार्याची माहिती सांगणारे माहिती पत्रक राजकीय पक्षांचे कार्यकर्ते घरपोच करताना दिसून येत आहे. तर काही राजकीय पक्षांनी सुंदर पहाट अन् सुंदर सायंकाळ गाण्यांच्या कार्यक्रमाच्या मैफिली आयोजित केल्या आहेत.त्यामुळे यावर्षी दिवाळीतील पहिल्या अभंग स्नानाला राजकीय पक्षांकडून दिलेल्या प्रचाराच्या उटण्याचा सुगंध दरवळणार आहे.

पनवेल महापालिकेची निवडणूक होऊन पाच वर्षाचा कार्यकाल ही समाप्त झाला . तत्कालीन नगरसेवकांकडून बेकायदा वापर होत असल्याचे निदर्शनास येतात महापालिका प्रशासनाकडून लेटर पॅड व शिक्के ही माजी नगरसेवकांकडून जमा करण्यात आले. महापालिकेचे निवडणूक ही प्रस्तावित असून डिसेंबर किंवा जानेवारीमध्ये निवडणुकीचे पडघम वाजू लागणार आहेत. निवडणुकीचे वारे वाहू लागतात माजी झालेले नगरसेवक व निवडणुकीत उमेदवारी मिळण्याच्या शक्यतेने बाशिंग बांधून राहिलेले विविध पक्षाच्या कार्यकर्ते आताजोमाने कामाला लागलेले दिसून येत आहेत .अनेक जण विविध कार्यक्रमाची रेलचल करून कायम प्रकाश झोतात राहण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत.यामध्ये रक्तदान शिबिर ,महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर, मोफत चष्मे वाटप, वृक्षारोपण ,स्वच्छता मोहीम ,ज्येष्ठ नागरिक संघाचे विविध कार्यक्रम आयोजित करणे ,सोसायटीमध्ये किल्ला स्पर्धा भरवणे, गणेशोत्सवामध्ये आरास स्पर्धा भरवणे असे विविध कार्यक्रम राबवून मतदारांपर्यंत थेट पोहोचण्याचा प्रयत्न भावी उमेदवार मोठ्या संख्येने करीत आहेत. आता एन दिवाळीच्या सणात विविध राजकीय पक्षांकडून दिवाळीपूर्वी मोफत अन्नधान्य किराणा माल वाटप कार्यक्रम, सुगंधित उटणे व त्यासोबत पणत्या घरपोच वाटप कार्यक्रम केला जात आहे. सुगंधी उठण्या च्या पाकिटा समवेत कार्याची छबी दाखवणारे माहितीपत्रकही घरपोच देऊन मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे नागरिकांच्या लक्षात येत आहे. कळंबोलीत काही नागरिकांच्या घरात पाच ते सहा ऊटणे पाकीट, सात ते सात पणत्या घरपोच मिळाल्या असल्याचे सांगण्यात आले आहे. दिवाळी सारखा आनंदी व हौस मौज करणाऱ्या सणात जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या भावी उमेदवारांनी दिवाळीनिमित्त सुरेल गाण्यांच्या मैफिली आयोजित करण्यासाठी सुंदर पहाट, सुंदर सायंकाळ कार्यक्रमाचे आयोजन ही करण्यात आले आहे . या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्यासाठी सोशल मीडियाचा वापरही करण्यात येत आहे.काही संभाव्य उमेदवारांनी आकाश कंदीलाचेही मोफत वाटप केले आहे . कळंबोली वसाहतीसह पनवेलच्या विविध भागात बॅनर बाजी ही मोठ्या प्रमाणावर करून मतदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.एकंदरीत पनवेल महापालिकेची होणारी निवडणुकी चुरशीची होणार असल्याचे दिसत आहे .नुकत्याच शिवसेनेमध्ये निर्माण झालेल्या शिंदे व ठाकरे गटामध्येही मोठी रस्सीखेच पनवेल मध्ये पहावयास मिळणार आहे. पनवेल महापालिकेच्या पार्श्वभूमीवर मतदारांची मात्र दिवाळी ही चांगलीच गोड होणार आहे.

# ३१ ऑक्टोबर पासून दक्षता जनजागृती सप्ताह

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सोमवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील बैठक कक्षात भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत जनजागृती करण्यासाठी भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे, अशी माहिती कोकण विभागाचे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे यांनी दिली.

देशाच्या आर्थिक, सामाजिक तथा राजकीय प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा एक मोठा अडथळा आहे. या भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी, भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत जनजागृती करण्यासाठी, ३१ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत 'दक्षता जनजागृती सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. 'भ्रष्टाचारमूक्त भारत–विकसित भारत' (Corruption free India for a developed Nation) ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे. दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थांमार्फत या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख किंवा ज्येष्ठतम अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी / कर्मचारी प्रतिज्ञा घेतील. प्रतिज्ञा घेतल्यानंतर राज्यपाल व मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल. कोणीही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना किंवा भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास तक्रार कोठे करावी. याबाबत संबंधित नागरिकांना माहिती असणे गरजेचे आहे.

तसेच, भ्रष्टाचारास आळा बसण्यासाठी नागरिकांचाही सहभाग महत्वाचा असल्याने 'दक्षता जनजागृती सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले आहे. भ्रष्टाचाराशी संबंधित कोणतीही घटना घडत असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागास कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोकण भवन इमारतीतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सोमवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील बैठक कक्षात भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा घेण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कोकण विभागाचे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे यांनी केले आहे.

# मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते रानसई खोंड्याची वाडी अंगणवाडीचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन निधीतून बांधण्यात आलेल्या रानसई खोंड्याची वाडी अंगणवाडीचे उदघाट्न सोहळा माजी आमदार मनोहरशेठ भोईर हस्ते व उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार दिनाकं २०/१०/२०२२ रोजी संपन्न झाला.यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर व तालुकाप्रमुख संतोष ठाकूर म्हणाले की, शिवसेनेच्या माध्यमातून ही सर्व विकास कामे या दुर्गम भागात होत आहेत तरी येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूकीत भगवा झेंडा फडकवून आपल्या वाडीतील उर्वरित विकास कामे करून घ्यावीत व सदैव शिवसेने सोबत राहावे असे आवाहन केले. या वेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख संदेश पाटील,उरण शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, कु कोमल भोईर,प्रफुल म्हात्रे, पी डी घरत, प्रकाश म्हात्रे,सरपंच सौ भगतताई, गणपत शिनगा, शिवसेना शाखा रानसई चे पदाधिकारी दीपक लेंडे, बाळाराम खंडवी, आयत्या दोरे, भास्कर बांगारी,मधु वीर, दिनेश बांगारी, पद्माकर वीर, रामा पारधी, मोहन उघडा, महादेव बांगारी, नरेश भल्ला, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ व विध्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा : गजेंद्र घाडगे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

किसान क्रेडिट कार्ड म्हणजेच केसीसी ही एक योजना आहे, जिचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीसंबंधीच्या कामासाठी आर्थिक मदत करणं हा आहे. केसीसीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बी–बियाणे, खतं, कीटकनाशकं इत्यादी शेतीच्या काम ंसाठी कर्ज दिलं जातं; जे शेतकरी पी.एम किसान योजना लाभार्थी आहेत. परंतु अद्याप कोणत्याही बॅकेचे पिक कर्ज नसेल, अशा शेतकऱ्यांनी केसीसी कार्डचा लाभ घ्यावा, असे आवाहन बॅक ऑफ इंडिया शाखा पोलादपूर व्यवस्थापक गजेंद्र घाडगे यांनी केले. तालुका कृषी अधिकारी पोलादपूर यांचे वतीने देवपूर येथे क्रॉपसॅप अंतर्गत भात शेतीशाळा पाचव्या वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बॅक ऑफ इंडिया शाखा पोलादपूर व्यवस्थापक गजेंद्र घाडगे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील, कृषी सहाय्यक मनोज जाधव, गुरुमाऊली शेतकरी गट अध्यक्ष जगदीश महाडिक, सचिव महादेव शिंदे, माजी सरपंच गणपत महाडिक, प्रविण महाडिक, ज्ञानेश्वर पवार, विजय मोरे, आदी शेतकरी उपस्थित होते.

केसीसी अंतर्गत एखाद्या शेतकऱ्याला किती कर्ज द्यायचं, हे त्या शेतकऱ्याचं उत्पन्न किती आहे, त्याच्याकडे जमीन किती आहे आणि त्या जमिनीवर लागवडीखालील क्षेत्र किती आहे, यावरून ठरवलं जातं. केसीसी अंतर्गत शेतकऱ्याला ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिलं जातं. इथं एक गोष्ट लक्षात घ्यायची ती म्हणजे १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिलं जातं, तर त्यापेक्षा अधिक पण ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी तारण ठेवणं गरजेचं असतं, असे सांगून केसीसीवरून जे काही कर्ज दिलं जातं त्यावर ७ टक्के व्याजदर आकारला जातो.